Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड दर्पण

वरुड | शनिवार
१३.०६.२०२६

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १३३ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### विद्यार्थ्यांना मिळणार एसटीचे डिजिटल 'रुपे' कार्ड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने विद्यार्थ्यांसह विविध सवलतधारक प्रवाशांसाठी 'रुपे ऑन द गो' ही एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) प्रणालीवर आधारित नवीन कार्ड योजना सुरू केली असून, लवकरच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी या कार्डच्या नोंदणी प्रक्रियेला गती देण्यात येणार आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या डिजिटल व्यवहारांना चालना देण्याच्या धोरणानुसार राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सवलतीच्या प्रवासासाठी स्वतंत्र पासऐवजी आधुनिक, सुरक्षित आणि डिजिटल कार्डचा लाभ मिळणार आहे.

### घरी कोणी नसल्याची संधी साधत चोरट्यांनी

# भरदुपारी कुलूप तोडून १० लाखांचे दागिणे केले लंपास

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – घरी कोणी नसल्याची संधी साधत चोरट्यांनी भर दुपारी वरुड शहरातील मध्यवस्तीमध्ये रेडिमेड कापड व्यावसायिकाच्या घराचे कुलूप तोडून तब्बल दहा लाखांपेक्षा जास्त रुपयांच्या मुद्देमाल चोरुन नेला असून याप्रकरणी वरुड पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध पूर्ण दाखल केला आहे. भर दुपारी घडलेल्या या घटनेने शहरात मात्र खळबळ माजली आहे.



शहरातील मेन रोड परिसरामध्ये विकास निचत यांचे पुजा गारमेंटस नावाचे दुकान असून दुकानाच्या समोरच्या बाजुला असलेल्या पोस्ट ऑफीस समोर असलेल्या स्वत:च्या मालकीच्या ईमारतीमध्ये निचत परिवारातील तिघे भाऊ राहतात. ईमारतीच्या मधल्या मजल्यावर विकास निचत हे त्यांच्या परिवारासह निवास करीत होते. पत्नी श्रध्दा ही मुलाबाळांसह माहेरी गेल्यामुळे विकास हे एकटेच घरी होते तर वरच्या मजल्यावर मात्र तिघांपैकी एका परिवारातील काही सदस्य सुध्दा होते. असे असतांना काल (ता.१२) दुपारी १ च्या सुमारास विकास निचत हे दुकानातून आराम करण्याकरीता घरी आले आणि दुपारी २ च्या सुमारास पुन्हा दुकानात गेले. रात्री १० च्या सुमारास विकास हे पुन्हा दुकानातून घरी आले तेव्हा घराचा मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले म्हणुन त्यांनी आतमध्ये जावुन पाहणी केली असता कपाटातील साहित्य अस्ताव्यस्त आढळून आले. अधिक चौकशी अंती कपाटातील दागदागिण्यांसह मौल्यवाण साहित्य आणि रोख रक्कम कोणी तरी अज्ञात ईसमाने चोरुन नेली असावी, असा संशय निर्माण झाल्याने त्यांनी थेट पोलिस स्टेशन गाठले आणि तक्रार दाखल केली.

काही वेळातच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांच्या चौकशी मध्ये कपाटातील सोनाच्या बांगडया, गोफ, अंगठी, मंगळसुत्र, चांदीच्या तोरटया, ब्रेसलेट व नगदी ५ हजार रुपये असे एकूण १९९ ग्रॅम सोने आणि ६० ग्रॅम चांदी असा एकूण १० लाख १२ हजार रुपयांचा मुददेमाल चोरुन नेला.

भरदुपारी आणि शहराच्या मध्यवस्तीत घडलेल्या या घटनेने शहरात खळबळ माजली असून पोलिसांनी घटनास्थळावर ठसे तज्ञ तसेच श्वानपथक दाखल केले होते परंतु अद्याप कोणत्याही प्रकारचा सुगावा लागु शकला नाही. या प्रकरणी विकास शेषराव निचत यांचे फिर्यादीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञाताविरुध्द ३३१ (३), ३०५ बी.एन.एस.अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

# लँडिंगदरम्यान अनर्थ! जोरहाटमध्ये भारतीय हवाई दलाचे विमान कोसळले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जोरहाट** – आसाममधील जोरहाट येथे शनिवारी (दि.१३) भारतीय हवाई दलाच्या एएन–३२ या लष्करी वाहतूक विमानाचा अपघात झाला. जोरहाट एअर फोर्स स्टेशन विमानतळावर लँडिंग करत असताना हे विमान कोसळल्याची माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत वैमानिकाचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात असून अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. लँडिंगदरम्यान घडला अपघात प्राथमिक माहितीनुसार, विमानाने एअरबेसवर लँडिंग केल्यानंतर काही क्षणांतच हा अपघात घडला. दुर्घटनेनंतर विमानाचे मोठे नुकसान झाल्याचे व्हिडीओ समोर आले असून घटनास्थळी विमानाचे अवशेष विखुरलेले दिसत आहेत. अपघाताची माहिती मिळताच संरक्षण दलाचे जवान आणि



आपत्कालीन पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. त्यानंतर परिसर सील करून बचावकार्य सुरू करण्यात आले. विमानाला आग लागल्याची माहिती विमान जमिनीवर उतरल्यावर त्याला आग लागल्याचे सांगितले जात आहे. दुर्घटनास्थळावरून धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळा दिसून आल्याने अग्निशमन दलाच्या पथकांना तातडीने पाचारण करण्यात आले. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले. वैमानिकाच्या मृत्यूची भीती या दुर्घटनेत वैमानिकाचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. मात्र विमानात किती कर्मचारी होते किंवा अन्य कोणी जखमी झाले आहे का, याबाबत अद्याप अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. एएन–३२ विमानाचे महत्त्व एएन–३२ हे भारतीय हवाई दलाकडून मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे दुहेरी इंजिन असलेले लष्करी वाहतूक विमान आहे. सैनिकांची वाहतूक, रसद पुरवठा आणि दुर्गम तसेच उंच भागांमधील मोहिमांसाठी या विमानाचा वापर केला जातो.

# अल्पवयीन युवकाचा ट्रॅक्टर चालवितांना अपघाती मृत्यू

### बेनोडा (शहीद) जवळील टेंभणी शेतशिवारातील दुर्दैवी घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या टेंभणी शेतशिवारातील प्रमोद धुर्वे यांचे शेतात आज ट्रॅक्टर ने बेड पाडण्याचे काम सुरु असतांना शेतातील नालीमध्ये ट्रॅक्टरचा चाक गेल्याने ट्रॅक्टर पलटुन अल्पवयीन – ट्रॅक्टर चालक युवकाचा ट्रॅक्टरखाली दबुन घटनास्थळीच मृत्यु झाल्याची घटना आज १२ जुन रोजी सकाळचे सुमारास घडली.





प्राप्त माहितीनुसार, प्रमोद – दौलतराव धुर्वे रा. शिंगोरी यांचे टेंभणी शेत शिवारात शेत आहे. त्यांनी आज शेतामध्ये बेड पाडण्याचे काम करण्यासाठी गणेश सदाशिवराव धुर्वे रा.काचुर्णा यांचे ट्रॅक्टर भाडयाने सांगीतले होते. न त्यानुसार आज सकाळचे सुमारास अल्पवयीन मुलगा वय १६ वर्ष रा. १ काचुर्णा नामक ट्रॅक्टर घेउन प्रमोद धुर्वे यांचे शेतात पोहचला आणि शेतात बेड पाडण्याचे कामाला त्याने सुरुवात केली.

याच दरम्यान सकाळी ९:३० वाजता ट्रक्टरचे एक चाक शेतातील नालीमध्ये गेल्याने ट्रॅक्टर चालक ट्रॅक्टर वरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर पलटी झाला आणि याच ट्रॅक्टरखाली दबुन नामक अल्पवयीन चालकाचा घटनास्थळीच मृत्यु झाला.

दरम्यान आजु बाजुच्या शेतातील नागरीकांनी घटनास्थळी धाव घेउन चालकाचा चा मृतदेह ट्रॅक्टर बाहेर काढून या घटनेची माहिती बेनोडा (शहीद) पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र काळे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक ललीत तायडे, हे. कॉ. निलेश डफफडे यांनी घटनास्थळ गाठुन पंचनाम्याअंती चालकाचा मृतदेह वरूड ग्रामिण रुग्णालयात रवाना केला असुन पुढील तपास बेनोडा (शहीद) पोलीस करीत आहे.

# विलीनीकरणाचा फायदा भाजपलाच : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### पंडित नेहरू-पंतप्रधान मोदी यांच्यात तुलना नाही

(प्रतिनिधी वरुड दर्पण)


**मुंबई** – 'काँग्रेस आणि प्रादेशिक समविचारी पक्षांचे विलीनीकरण झाल्यास भाजपला त्याचे कोणतेही नुकसान नाही तर फायदाच होईल. जितके विरोधी पक्ष एकत्र होतील तितका अधिकचा राजकीय अवकाश भाजपला प्राप्त होणार आहे. त्यामुळे या पक्षांच्या विलीनीकरणाची भाजप चिंता करत नाही आणि आम्ही सध्या 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत आहोत', असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे सांगितले.




काँग्रेस पक्ष हा बुडते जहाज आहे आणि संबंधित प्रादेशिक पक्षांचे नेते अनुभवी आणि राजकीयदृष्ट्या परिपक्व आहेत. त्यामुळे बुडत्या जहाजात कोणी पाय ठेवेल अशी शक्यता नाही, असा टोलाही फडणवीस यांनी लगावला.


**नेहरू आणि मोदी यांची तुलना केलेली नाही...**

मात्र त्याचवेळी राजकारणात कोणतीही शक्यता नाकारता येत नसल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी जर अशा प्रकारचे विलीनीकरण झालेच तर त्याचा भाजपला कोणताही तोटा होणार नसल्याचा विश्वास व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोदी यांची तुलना नेहरूंसोबत करणे अनावश्यक असल्याचे म्हटले आहे.












# ‘पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जवाहरलाल नेहरूंच्या खूपच पुढे’, शरद पवारांच्या वक्तव्यावरून मंत्री चंद्रकांत पाटील यांचं प्रत्युत्तर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जवाहरलाल नेहरूंच्या खूपच पुढे आहेत. नरेंद्र मोदी यांची पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याशी तुलना होऊच शकत नाही.

असं वक्तव्य भाजपचे जेष्ठ नेते आणि राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलं आहे. ते कोल्हापुरात बोलत होते. शरद पवार हे नेहमी गुगली टाकत असतात. शरद पवारांना हेच म्हणायचं होतं की मोदी हे मोदी आहेत. होऊच शकत नाही. असे देखील ते पुढे बोलताना म्हणाले.

महाराष्ट्राच्या मंत्र्यांनी केलेलं वक्तव्य हे अजिबात आम्हाला मंजूर नसल्याचे शरद पवार यांनी नुकतंच सांगितले होत. एक गृहस्थ जवाहरलाल नेहरू बाबत बोलले. सध्या नेहरू आणि मोदी अशी अशी स्पर्धा लावली जात आहे. अनेक वर्ष प्रधानमंत्री होते.

इंग्रजांच्या अत्याचारातून मुक्त करण्याचं काम नेहरू यांनी केलं ते आपण विसरू शकत नाही. नेहरू हे नेहरू होते त्यांच्यासोबत तुलना होऊच शकत नाही, अशा शब्दात शरद पवार यांनी तुलना करणाऱ्यांना फटकारलं होतं. याबाबत मंत्री चंद्रकांत पाटील यांना विचारलं असता त्यांनी यावर भाष्य करत प्रतिक्रिया दिली आहे.

मोदींनी जगामध्ये देशाचं नाव चांगल्या पद्धतीने कमावले, तुलना होऊच शकत नाही नेहरू स्वातंत्र्याच्या आधी जन्माला आले आणि मोदी स्वातंत्र्यानंतर जन्माला आले,पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणीबाणीमध्ये खूप संघर्ष केला.

# तडजोडवादी पंतप्रधानांकडून भारतीयांचे रक्षण अशक्य

## भारतीय खलाशांच्या मृत्यूवरून राहुल गांधींचा मोदींवर घणाघात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – अमेरिकेच्या लष्करी हल्ल्यात तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाल्याच्या अत्यंत गंभीर प्रकरणावरून काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे.

एक तडजोडवादी पंतप्रधान भारतमातेच्या सुपुत्रांचे रक्षण करू शकत नाही, अशा शब्दांत टीका करत राहुल गांधी म्हणाले की, ज्यांनी आपल्या खलाशांचे प्राण घेतले, त्यांना जाब विचारण्याचे किंवा त्यांना नाराज करण्याचे धाडस आणि ताकद पंतप्रधानांकडे नाही.

तीन निष्पापांप्रति बोलायला त्यांच्याकडे शब्दही नसेल पंतप्रधानांवर टीका करताना ते पुढे म्हणाले, ‘ते कधीही एक शब्द उच्चारू शकत नाहीत. पुढील आठवड्यात जी-७ परिषदेमध्ये, आपल्या खलाशांच्या हत्येनंतर अवघ्या काही दिवसांतच मोदीजी हसतील, मिठी मारतील आणि करारांवर स्वाक्षऱ्या करतील. पण त्या तीन निष्पाप भारतीयांसाठी त्यांच्याकडे बोलायला एक शब्दही नसेल. तडजोडवादी पंतप्रधान भारतमातेच्या सुपुत्रांचे रक्षण करू शकत नाही, कारण ज्यांनी या सुपुत्रांचे प्राण घेतले, त्यांच्यासमोर उभे राहण्याचे धैर्य किंवा ताकद त्यांच्यात नाही.

पंतप्रधानांकडे बोलण्याचे धाडस हवे राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर हिंदीत एक पोस्ट शेअर करत या संपूर्ण प्रकरणावर व पंतप्रधान मोदींच्या मौनावर गंभीर सवाल उपस्थित केले आहेत.

गेल्या तीन दिवसांत आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात तीन जहाजांवर झालेल्या अमेरिकन हल्ल्यात तीन भारतीयांना आपला जीव गमवावा लागला असून आपले तडजोडवादी पंतप्रधान एक शब्दही बोलत नाहीत. जेव्हा कोणतीही परकीय सत्ता एखाद्या भारतीय नागरिकाची हत्या करते, तेव्हा पंतप्रधानांकडे बोलण्याचे धाडस असायला हवे, असे राहुल गांधी म्हणाले.

# उपनिरीक्षकाची रेल्वेच्या गेटमनला मारहाण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## अमरावती-जबलपूर एक्स्प्रेस ४० मिनिटे खोळंबली

## पांढुर्णा स्थानकावरील घटना : रेल्वे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड संताप

**वरुड** – कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या एका पोलीस उपनिरीक्षकाने रेल्वेच्या गेटमनला मारहाण केल्याची धक्कादायक एक्स्प्रेस घटना पांढुर्णा रेल्वे स्थानक परिसरात घडली. या प्रकारामुळे अमरावती-जबलपूर तब्बल ४० मिनिटे खोळंबून राहिली असून रेल्वे कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, एका किरकोळ कारणावरून संबंधित पोलीस उपनिरीक्षक आणि रेल्वे फाटकावरील कर्मचाऱ्यामध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर मारहाणीत झाले आणि उपनिरीक्षकाने गेटमनला बेदम मारहाण केली. या घटनेमुळे घाबरलेला रेल्वे कर्मचारी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी घटनास्थळावरून पळाला. तो सुमारे एक किलोमीटर अंतरावरील पांढुर्णा रेल्वे स्थानक व्यवस्थापकांच्या कक्षात जाऊन आश्रय घेतला.

दरम्यान, संतप्त उपनिरीक्षक तेथेही पोहोचला आणि स्थानक प्रशासनासमोरच संबंधित कर्मचाऱ्याला धमकावल्याचे सांगण्यात येत आहे. या गोंधळामुळे रेल्वेच्या कामकाजावर परिणाम झाला. सुरक्षा आणि संकेत यंत्रणेशी संबंधित प्रश्न निर्माण झाल्याने पांढुर्णा स्थानकावर आलेली १२१५९ अमरावती जबलपूर एक्स्प्रेस नियोजित वेळेत पुढे रवाना होऊ शकली नाही. परिणामी ही गाडी सुमारे ४० मिनिटे स्थानकावरच थांबून राहिली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासन, रेल्वे सुरक्षा बल आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यानंतर रेल्वे वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

या घटनेमुळे रेल्वे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. कायद्याचे पालन करवून घेणाऱ्या अधिकाऱ्यानेच अशा प्रकारचे वर्तन केल्याने नागरिकांमधूनही संताप व्यक्त केला जात आहे. रेल्वे प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे.

# राज्यातील महिला शेतकऱ्यांना मिळणार वैधानिक ‘शेतकरी’ दर्जा : विधिमंडळात येणार विधेयक, मुख्यमंत्र्यांचे निर्देश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मुंबई** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबई येथील वर्षा निवासस्थानी ’महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६’ संदर्भात बैठक पार पडली. राज्यातील महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६’ पावसाळी अधिवेशनात सादर केले जाणार आहे. महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन त्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाला चालना मिळावी यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील कृषी क्षेत्रात ८१% हून अधिक महिलांचा सहभाग आहे. कृषी योजनांचा लाभ महिलांना मिळावा यासाठी जमिनीची मालकी ही अट असल्याने मोठ्या संख्येने महिला शेतकरी योजनांपासून वंचित राहतात. कुटुंबाच्या किंवा सामुदायिक जमिनीवर शेती करणाऱ्या महिला, तसेच मत्स्यव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, वनउपज संकलन यांसारख्या पूरक व्यवसायांमध्ये कार्यरत महिलांनाही शेतकरी म्हणून मान्यता मिळत नाही. या पार्श्वभूमीवर हे विधेयक तयार करण्यात आले आहे. सर्व सूचनांचा विचार करून विधेयकाचा अंतिम मसुदा तयार करा. कृषी क्षेत्रातील महिलांना ‘शेतकरी’ म्हणून वैधानिक मान्यता देणे, त्यांच्यासाठी संस्थात्मक यंत्रणा उभारणे, कर्ज, तंत्रज्ञान, बाजारपेठ व विविध सेवा महिलांपर्यंत पोहोचविणे हा उद्देश असावा, पारंपरिक शेतीबरोबरच पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग, बागायती, फुलशेती, मशरूम उत्पादन, कृषी वनीकरण, वनउपज संकलन असे विविध उपक्रम तसेच भूमिहीन शेतकरी, भाडेकरू शेतकरी, शेतमजूर, चराई व्यवसाय करणारे आणि स्थलांतरित कृषी कामगार यांचाही यामध्ये समावेश करावा. महिलांना राज्य शासनाच्या कर्ज योजना, कृषी अनुदाने, बियाणे, खते, पीक विमा, विस्तार सेवा, बाजारपेठ सुविधा, वाहतूक, साठवणूक आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळू शकेल अशी डिजिटल प्रभावी यंत्रणा कार्यान्वित होण्यासाठी सर्व अभ्यास करावा. महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र ‘महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी’ स्थापन करणे, विधेयकाच्या प्रभावी अंमल बजावणीसाठीची यंत्रणा यांचा देखील अभ्यास केला जावा. जिल्हा आणि तालुका व गावस्तरापर्यंत मजबूत यंत्रणा असली पाहिजे. या कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय देखरेख समिती असावी जेणेकरून या कायद्याच्या अंमलबजावणीचे नियमित परीक्षण केले जाऊ शकेल.

# तब्बल 33 वर्षानंतर आली प्रशासनाला जाग, मौनीबाबा शिक्षण संस्थेच्या विश्वस्तांवर तीन गुन्हे दाखल : बुलढाण्यात खळबळ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**बुलढाणा** – बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील रामकृष्ण परमहंस मौनीबाबा शिक्षण संस्थेच्या विश्वस्तांवर फसवणूक आणि बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या तीन शासकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरून तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामुळे मात्र ३३ वर्ष जुन्या मौनी बाबा शिक्षण संस्थेबाबत जिल्हाभरात जोरदार चर्चा सुरु झाली आहे.१९९२ साली म्हणजेच ३३ वर्षांपूर्वी अनुराधा अभियांत्रिकी आणि अनुराधा पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या इमारतींचे बनावट भोगवटा प्रमाणपत्र तयार करून त्याचा शासकीय कामात वापर केल्याचा ठपका विश्वस्थांवर ठेवण्यात आला आहे. नगर परिषद चिखलीच्या प्रभारी नगर रचना सहाय्यक कांचन हिरामण राठोड यांनी याप्रकरणी दिलेल्या फिर्यादी वरून चिखली पोलिसांनी भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ४२०, ४६५, ४६८ आणि ४७१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

तर दुसरा गुन्हा पंचायत समितीच्या विस्तार अधिकारी नितीन शेळके यांनी दिलेल्या तक्रारीवरून दाखल करण्यात आला त्यांच्या तक्रारीनुसार विश्वस्त मंडळाने कट रचून १९९२ पासून अनुराधा इंजीनियरिंग कॉलेज व अनुराधा पॉलिटेक्निक करिता परवानगीसाठी जोडलेले प्रमाणपत्र बनावट तयार करून खरे असल्याचे भासवून त्याआधारे परवानगी प्राप्त केली. सदर परवानगीचे आधारे शासनाकडून निधी प्राप्त केल्याचे निष्पन्न झाला आहे.

## शेताच्या धुऱ्याची किनार व बांध खोदून नुकसान केल्याप्रकरणी

# वरिष्ठांकडे तक्रार : कारवाहीकडे अनेकांचे लक्ष

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – तालुक्यातील बारगांव येथील शेतकरी मोहन जगन्नाथराव दिघेकर यांनी त्यांच्या शेताच्या धुऱ्याची किनार व बांध खोदून नुकसान केल्याप्रकरणी संबंधितांविरोधात तलाठी कार्यालयात लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, सर्वे नं. २२ मधील शेताच्या धुऱ्यालगत असलेल्या नाल्यामध्ये बांध घालून पावसाचे पाणी त्यांच्या शेताकडे वळिवण्यात आले. त्यामुळे पावसाळ्यात शेतात पाणी साचून पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे त्यांनी नमूद केले आहे तसेच संबंधित व्यक्तींनी शेताच्या धुऱ्यावरील झाडांची मुळे उघडी करुन झाडांचे नुकसान केले. धुऱ्यावरील तार कंपाऊंडजवळ गाय व म्हैस बांधून लोखंडी अँगल सैल केले तसेच तार तोडून नुकसान केल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे.

याबाबत जाब विचारल्यानंतर संबंधितांकडून मारहाण करण्याच्या धमक्या देण्यात आल्याचा गंभीर आरोप शेतकरी मोहन दिवेकर यांनी केला आहे.

या प्रकारामुळे शेताचे आर्थिक नुकसान होण्याची भिती व्यक्त करत त्यांनी महसूल प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून दोषींवर योग्य कारवाई करावी व न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे. दरम्यान, या तक्रारीची प्रत तहसीलदार वरुड तसेच बेनोडा (शहीद) पोलीस स्टेशन यांनाही देण्यात आली असून प्रशासन याबाबत कोणती कारवाई करते याकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय

**चला आपले आज आपण येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्या साठी त्याग करू.**

## शेतकऱ्यांची कोंडी आणि महाराष्ट्रातील राजकीय सारीपाट

महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक इंजिन आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील राज्य मानले जाते. परंतु, गेल्या काही काळापासून राज्यातील राजकीय आणि प्रशासकीय वातावरण ज्या वळणावर येऊन पोहोचले आहे, ते पाहता सामान्य जनता, विशेषतः बळीराजा कमालीचा होरपळून निघत आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या निवडणुका आणि त्यामुळे लागू झालेली आदर्श आचारसंहिता यामुळे राज्यातील संपूर्ण शासकीय यंत्रणेला जणू 'पक्षाघात' झाला आहे. 'निवडणुका आल्या की आचारसंहिता लागणार आणि आचारसंहिता लागली की विकासकामे ठप्प होणार,' हे समीकरण महाराष्ट्राला नवे नाही; परंतु सध्याची परिस्थिती केवळ विकासकामे थांबण्यापुरती मर्यादित नसून, ती राज्याला आर्थिक आणि सामाजिक अस्थिरतेकडे ढकलणारी ठरत आहे. या संपूर्ण चक्रव्यूहात सर्वाधिक फटका बसला आहे तो महाराष्ट्राच्या कणा असलेल्या शेतकऱ्याला. 'शेतकरी कर्जमुक्ती' हा केवळ एका राजकीय पक्षाचा जाहीरनामा नसून, ती या मातीतील लाखो शेतकऱ्यांची जगण्याची धडपड आहे. मात्र, ऐन निवडणुकीच्या तोंडावर आचारसंहितेचे निमित्त पुढे करून कर्जमुक्तीच्या प्रक्रियेला जी खीळ बसली आहे, ती अत्यंत चिंताजनक आहे. दुसरीकडे, या प्रशासकीय स्तब्धतेचा गैरफायदा घेत काही अदृश्य आणि स्वार्थी घटकांकडून महाराष्ट्रात जाणीवपूर्वक अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे चित्र उघडपणे दिसत आहे. आचारसंहिता की प्रशासकीय निष्क्रियतेचे ढाल? आदर्श आचारसंहितेचा मुख्य उद्देश निवडणुकीच्या काळात सत्ताधारी पक्षाला मतदारांवर प्रभाव टाकण्यापासून रोखणे आणि पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पाडणे हा असतो. लोकशाहीच्या निकोपतेसाठी ते आवश्यकच आहे. परंतु, महाराष्ट्रात आचारसंहितेचा अर्थ 'प्रशासकीय सुट्टी' असा घेतला जातो की काय, अशी शंका यावी इतकी परिस्थिती गंभीर आहे. सध्या राज्यातील सर्वच शासकीय कार्यालयांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळत आहे. सर्वसामान्य नागरिकांचे दाखले, रस्ते-पाण्याची कामे, आरोग्याशी संबंधित योजना आणि विविध शासकीय अनुदाने पूर्णपणे रखडली आहेत. अधिकारी आणि कर्मचारी निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्याचे कारण पुढे करून जनतेला ताटकळत ठेवले जात आहे. आचारसंहिता ही नवीन धोरणात्मक निर्णय घेण्यास किंवा मतदारांना आकर्षित करणाऱ्या नवीन घोषणा करण्यास मनाई करते; चालू असलेल्या लोककल्याणकारी योजना किंवा नैसर्गिक आपत्तीच्या काळात द्यावयाची मदत थांबवण्याचे समर्थन आचारसंहिता कधीच करत नाही. दुर्दैवाने, महाराष्ट्रात मात्र चालू कामांनाही ब्रेक लावून सर्व काही ठप्प पाडण्याची आत्मघातकी प्रवृत्ती वाढीस लागली आहे. शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ: कर्जमुक्तीला बसलेली खीळ महाराष्ट्राचा शेतकरी आज निसर्गाच्या लहरीपणाशी आणि बाजारातील अनिश्चिततेशी दोन हात करत आहे. कधी अस्मानी संकट तर कधी सुलतानी धोरणे यांच्या कात्रीत अडकलेला शेतकरी कर्जबाजारीपणाच्या गर्तेत बुडाला आहे. अशा स्थितीत, सरकारने जाहीर केलेली कर्जमुक्ती ही शेतकऱ्यांसाठी संजीवनी ठरणार होती. कर्जमुक्तीचे पैसे खात्यात जमा होतील आणि पुढील हंगामासाठी बँक पुन्हा नवीन कर्ज देईल, या आशेवर शेतकरी डोळे लावून बसला होता. 'बँकेच्या दारात उभा राहिलेला शेतकरी जेव्हा 'आचारसंहितेमुळे तुमचे पैसे रखडले आहेत' हे उत्तर ऐकतो, तेव्हा त्याच्या पायाखालची जमीन सरकते. आचारसंहितेचा अंमल सुरू होताच कर्जमुक्तीच्या याद्या थांबवण्यात आल्या, निधीचे वितरण रोखण्यात आले. परिणामी, शेतकऱ्याला नवीन पीककर्ज मिळणे कठीण झाले आहे. सावकारी पाशातून सुटण्यासाठी सरकारी मदतीची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्याला पुन्हा एकदा खाजगी सावकारांच्या दारात जाण्यास भाग पाडले जात आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा कलंक पुसण्याचे दावे करणाऱ्या राज्यकर्त्यांना आचारसंहितेच्या तांत्रिक अडचणी दूर करून शेतकऱ्यांना दिलासा देता आला नसता का? निवडणूक आयोगाची विशेष परवानगी घेऊन ही प्रक्रिया सुरू ठेवता आली असती, परंतु राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे बळीराजाला पुन्हा एकदा गृहीत धरले गेले आहे. अस्थिरतेचे कारस्थान आणि राजकीय स्वार्थ प्रशासकीय ठप्पतेच्या या काळात महाराष्ट्रात आणखी एक भयानक खेळ खेळला जात आहे. महाराष्ट्राची राजकीय संस्कृती ही वैचारिक मतभेदांची असली, तरी ती नेहमीच प्रगल्भ राहिली आहे. परंतु, अलीकडच्या काळात विविध घटकांकडून समाजात जाणीवपूर्वक विद्वेष, असंतोष आणि अस्थिरता निर्माण करण्याचे पद्धतशीर प्रयत्न सुरू आहेत.

# शिवसंस्थेचे नंदादीप : हर्षवर्धन देशमुख

हर्षवर्धन उपाख्य (भैय्यासाहेब) प्रतापसिंह देशमुख (अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती) यांचा आज ७५ वा अमृत महोत्सवी वाढदिवस आहे. ७५ वर्षांचा हा टप्पा म्हणजे अनुभव, सेवा आणि समर्पण ही त्यांची खरी ओळख आहे. जरुड ता.वरुड येथील एका सधन शेतकरी जून १९५१ रोजी एका कर्तृत्व संपन्न बालकाचा जन्म झाला. ते आज अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहेत. ही संपूर्ण शिवपरिवाराकरिता अत्यंत आनंदाची पर्वणी असून अशा पर्वकाळापर्यंतचे आदरणीय साहेबांचे शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक व कृषिविषयक प्रवास अनुभव हे पुढील पिढीसाठी एक आदर्शवत, प्रेरणादायी व दिशादर्शक स्वरुपाचे अमृतकुंभ ठरतील.

तिसरीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण जि.प.शाळेत जरुड या गावी झाले. बारावीपर्यंत मध्यप्रदेश मधील सिंधिया स्कूल ग्वाल्हेर, पदवीचे शिक्षण कला व वाणिज्य शासकीय महाविद्यालय, इंदोर, एल.एल.बी.ची सनद पुणे विद्यापीठातून घेतली. परंतु पुढे सामाजिक कार्याचा ध्यास आणि आस असल्यामुळे वकिलीचा व्यवसाय न करता अमरावती जिल्हा परिषदचे सदस्य म्हणून १९७९ ते १९९० कार्य केले, याच काळात जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्य पाहिले. त्यानंतर १९९० साली ते आमदार म्हणून निवडून आले. पुढे १९९५ ते २००० या कालावधीत दोन वेळा आमदार म्हणुन निवडून आले. राज्याचे राज्यमंत्री, महसूल व पर्यटन, तसेच कृषि व उद्यान विद्या, जलसंधारण कॅबिनेट मंत्री म्हणुन उत्कृष्टपणे कार्य केले. पुढे सन २००० ते २००४ काळात विदर्भ वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष झाले तेंव्हा अप्परवर्धा प्रकल्पाची पूर्णता, शरद उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित केली. जलसंधारण व फलोत्पादन विकासाला गती मिळाली. तसेच शेतक-यांच्या जीवनात समृद्धता आणली म्हणुन ते भाऊसाहेबांच्या विचारला गती व कृतीची जोड देणारे कृतीशील नेतृत्व होत. पुढे ते सन २००४ मध्ये पुन्हा आमदारपदी विराजमान झाले. श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे संस्थापक अध्यक्ष डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी १९३२ मध्ये स्थापन केलेल्या महाराष्ट्रातील अग्रगण्य व नामांकित शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आपल्याकडे आली असता गेल्या दहा वर्षापासून शिवसंस्थेसाठी अहोरात्र मेहनत घेऊन डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्यावर नितांत श्रद्धा असणारे भैय्यासाहेब यांनी आपल्या कार्याची सुरुवात अमरावती येथील डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृतीभवनातील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन केली. डॉ.भाऊसाहेब यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त सन २०२५ साली महाराष्ट्र शासनाच्या थोर व्यक्ती यांची जयंती साजरी करण्याच्या परिपत्रकात डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीचा समावेश झाल्याने आज संपूर्ण महाराष्ट्रात भाऊसाहेबांची जयंती साजरी करण्यात येते. डॉ.पंजाबराव देशमुख यांचे विचार व कार्य महाराष्ट्रातील सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत पोहचले जावेत या उद्देशाने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात आजपर्यंत ४०० हून अधिक व्याख्यानाचे आयोजन. वीर उत्तमराव मोहिते लिखित जागतिक कृषक क्रांतीचा विधाता: लोकनेता डॉ.पंजाबराव देशमुख, 'धर्माचा वैदिक वाययातील उगम व विकास' व 'स्पंदने' या ग्रंथाचे प्रकाशन करून भाऊसाहेबांचे विचार व कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविले.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे चरित्र 'ब्रेल लिपीत' प्रकाशित केले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे 'शिवसंस्था' या त्रैमासिक मुखपत्राचे मासिक स्वरुपात रुपांतर. भाऊसाहेबांच्या आठवणींची साठवण एकत्रित करण्यासाठी अमरावती येथे भव्य स्मृति संग्रहालयाची निर्मिती. डॉ.पंजाबराव देशमुख यांच्यासोबत कृषीमंत्री पदाच्या कार्यकाळात कार्य केलेले पद्मविभूषण डॉ.स्वामीनाथन यांची भाऊसाहेबांच्या कार्याविषयीची मुलाखत. डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या १२५ जयंती उत्सवानिमित्त अमरावती येथे २०२३ साली भव्य कृषी प्रदर्शनीचे आयोजन. डॉ.पंजाबराव देशमुखयांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त १२५ रुपये चांदीच्या नाण्यांची निर्मिती. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती यांनी एनआयआरएफ-२०२४ मध्ये भारतातील पहिल्या १०० गुणवंत महाविद्यालयात ९३ व्या क्रमांकावर स्थान प्राप्त केले तर विज्ञान महाविद्यालय, नागपूर एनआयआरएफ १५१ ते २०० मानकांमध्ये समाविष्ट. झच णडकअ योजनेअंतर्गत शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती, शिवाजी महाविद्यालय अकोट, धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर व शिवाजी महाविद्यालय चिखली या चारही महाविद्यालयांना प्रत्येकी ५ करोड रूपयांचे शासकीय अनुदान प्राप्त. शळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा मुल्यांकनात संस्थेच्या न्यू इंग्लिश हायस्कूल वरुड, श्री शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शी, श्री शिवाजी महाविद्यालय संलग्नित कनिष्ठ महाविद्यालय चिखली व विज्ञान महाविद्यालय संलग्नित कनिष्ठ महाविद्यालय नागपूर यांना अ मानांकन प्राप्त. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमात शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, मोर्शी जि.अमरावतीचा जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक तर मनालाल गुप्ता विद्यालय, चांदुर रेल्वे, आदर्श हायस्कूल दर्यापूर, श्री शिवाजी हायस्कूल, मुख्य शाखा अकोला, स्व.रा.जा.उपाख्य बाबासाहेब घारफळकर विद्यालय, घारफळ, श्री शिवाजी उच्च माध्यमिक शाळा चिखली यांनी तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे तर खल्लार हायस्कूल, खल्लार, आदर्श हायस्कूल आंजी मोठी या शाळांनी तालुकास्तरावर तृतीय क्रमांक पटकावला आहे. अशाप्रकारचे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना जाहीरपणे आव्हान करतात की, विद्यार्थ्यांना काळानुरुप अद्यावत ज्ञान देणे हे संस्थेसोबतच शिक्षकांचीही महत्त्वाची जबाबदारी आहे असे आवर्जून सांगतात तेंव्हा त्याचे स्वत: अनुसरण करुन 'आधी केले, मग सांगितले' या प्रमाणे कृती करतात. डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय म्हणजे विदर्भ परिसरातील सर्वसामान्यांची



जीवनदायीनी होय. याच परिसरात'छत्रपती शिवाजी महाराज' सभागृह, पदव्युत्तर शिक्षणाच्या विविध अभ्यासक्रमाची सोय उपलब्ध केली. संस्थेअंतर्गत येणाऱ्या शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या साह्याने डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातील रुग्णांसाठी 'अन्नपूर्ण योजना' कार्यान्वित केली आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सेवांतर्गत प्रशिक्षण संस्थेअंतर्गत शिक्षकांच्या क्षमता वृद्धीसाठी डॉ.पंजाबराव देशमुख शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण केंद्र, अमरावती अंतर्गत शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे आयोजन. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' संदर्भात अमरावती येथे २५ व २६ जुलै २०२५ रोजी प्राचार्यांचे राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथे 'डॉ.पंजाबराव देशमुख विज्ञान व नाविन्यपूर्ण उपक्रम' केंद्राची २०१९ पासून सुरूवात. या केंद्राला जोडून कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञान प्रयोग शाळेसाठी 'राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान' केंद्राकडून ३ कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त.संस्थेअंतर्गत १७ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयांच्या अभ्यासक्रमास सुरुवात. नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमाची अंमलबजावणी.

शैक्षणिक गुणवत्ता सुधारणेसाठी अख तंत्रज्ञानाच्या युगातही नवी आव्हाने पेलण्यासाठीचे शिक्षणातील गुणवत्ता व दर्जा कायम राहण्यासाठी कटिबद्ध आहे. 'माझी शाळा, माझी अस्मिता' हा शैक्षणिक गुणवत्ता सुधार उपक्रम संस्थेने सुरू केला आहे. विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन, सुप्त गुणांना चालना व आपणास आलेल्या समस्याचे निवारण करता यावे, यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे व श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने ५२ वे राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शन २८ जानेवारी २०२५ ते १ फेब्रुवारी २०२५ रोजी अमरावती येथे तर ५३ वे राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शन २८ जानेवारी २०२६ ते १ फेब्रुवारी २०२६ चे नागपूर येथील विज्ञान महाविद्यालयात यशस्वी आयोजन. आज संस्थेचे विविध शाळा, महाविद्यालयाच्या ठिकाणी ४२ पेक्षा जास्त विद्यार्थी वसतिगृहाची सोय. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी 'अनंत पंजाबराव देशमुख' अकादमीची, अमरावती येथे स्थापना करून विविध स्पर्धा परीक्षांची तयार करण्यासाठीचे विद्यार्थ्यांना समृद्ध असे दालन उभे करुन देण्यात आले. डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या विचाराशी श्री शिवाजी शिक्षण संस्था आजही बांधील असून शेतकऱ्यापर्यंत नवे तंत्रज्ञान पोहोचावे या उद्देशाने डॉ.पंजाबराव देशमुख यांनी १९५८ साली दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले होते. ते प्रदर्शन ९२ दिवस चालले होते. याद्वारे जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान भाऊसाहेबांनी भारतातील शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले. याच धर्तीवर भाऊसाहेबांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त सन २०२३ मध्ये दि.२७ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२३ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय कृषी प्रदर्शनाचे श्री शिवाजी कृषी महाविद्यालय अमरावती येथे भव्य आयोजन केले. डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या १२६ व्या जयंती निमित्त २०२४ मध्ये २७ डिसेंबर २०२४ रोजी राज्यस्तरीय केळी परिषदेचे आयोजन केले तर श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय, अमरावती येथे 'अतिघन आंबा लागवड' परिषदेचे दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी भव्य आयोजन. तसेच १२५ व्या जयंती निमित्त विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यातून एक उत्कृष्ट शेतकरी निवडून त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सपत्निक सत्कार करण्यात आला. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेचे फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य ऐतिहासिक आयोजन केले. विद्यार्थ्यासाठी विविध शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित. कोवीड- १९ सारख्या महामारीच्या काळात 'शिवसंस्थेने' सामाजिक उत्तरदायित्वाचा भाग म्हणून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री सहाय्य निधीत २ कोटी ०९ लाख रुपये स्वयंप्रेरणेने दिले. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालय, अमरावती येथे कोरोना काळात सर्वात मोठे 'प्राणवायू' निर्मिती केंद्र २४ ऑक्टोबर २०२१ रोजी स्थापन करण्यात आले. दलित मित्र समाजभूषण मा.पंढरीनाथ पाटील यांच्या चिखली येथील समाधीचे आधुनिकीकरण. श्री शिवाजी संस्थेच्या अमरावती येथील मुख्य कार्यालयाच्या आवारात छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षि छत्रपती शाहू महाराज व डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण केले आहे. २७ डिसेंबर २०२३ रोजी पासून 'डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती पुरस्कार' पाच लाख रूपये रोख रक्कमेचा सुरू करण्यात आला. पहिल्या पुरस्काराचे मानकरी मा. शरदचंद्रजी पवार साहेब, तर यावर्षीच्या दुसऱ्या२७ डिसेंबर २०२४ पुरस्काराचे मानकरी मा. नितीनजी गडकरी साहेब तर तिसरा पुरस्कार २७ डिसेंबर २०२५ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस यांना प्रदान करण्यात आला. तसेच शरदचंद्र पवार साहेबांच्या दान निधीतून शेतीत उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलेस श्रीमती शारदाबाई पवार पुरस्कार व ना.नितीनजी गडकरी साहेबांच्या दान निधीतूनशेतीत उत्कृष्ट काम करणाऱ्या पुरूषास स्व.शरद जोशी उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार (दोन्ही पुरस्काराची रोख रक्कम १,११,१११/रू.) दरवर्षी दिल्या जातो. डॉ.पंजाबराव देशमुख यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा यासाठी घरोघरी स्वाक्षरी मोहीम राबवली. डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या पापळ या जन्मगावी नवीन कृषी महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाची मान्यता. गडचिरोली सारख्या आदिवासी जिल्हयात गोंडवाना विद्यापीठाच्या अंतर्गत वडसा (देसाईगंज) येथे उच्चशिक्षण देण्यासाठी धाडसाचे पाऊल टाकले आहे.

हर्षवर्धन देशमुख साहेबांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सदस्य म्हणून दि. १ जून १९८७ ते १९९२ कार्य केले. ते आज गेल्या दशकापासून (सन २०१७) पासून ते आजपर्यंत श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून संस्थेची धुरा समर्थपणाने सांभाळत आहेत. समाजाने आपल्यावर सोपविलेले कोणतेही एकच कार्य निष्ठेने आणि प्रामाणिकपणे पार पाडले पाहिजे हे त्यांचे तत्त्व. याच कालावधीत सन २०२४ साली झालेल्या लोकसभेसाठी निवडणूक लढविण्याचा त्यांच्यासमोर पर्याय असतांनाही त्यांनी त्यास स्पष्टपणे नकार दिला. यावरून डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी उभारलेल्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेस समर्पित होऊन आपले कार्य करावे हीच मनाशी खुणगाठ बांधलेली दिसते. सर्वांना विश्वासात घेऊन काम करण्याची हातोटी, कार्यकारी सदस्यकडून जे जे चांगले निर्णय असतील त्याची अंमलबजावणी. आपल्या कामावरील अढळ निष्ठा, अथक परिश्रम, कार्यतत्परता, स्वच्छ व पारदर्शक प्रशासन, यामुळेच डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी स्थापन केलेल्या 'श्रद्धानंद छात्रालय' ते 'श्री शिवाजी शिक्षण संस्थाचे' आज विशाल वटवृक्षात झालेले रूपांतर हे ङ्गइवलेसे रोप लावियेले द्वारी । त्याचा वेलू गेला गगनावरी ।अशा स्वरूपात दिसून येते. ही सर्व कृतज्ञता, उदारता व मानवता भैय्यासाहेबांच्या कार्य, कर्तृत्व व नेतृत्व शैलीतून दिसून येते. एवढया मोठया पदावर ते विराजमान असले तरी त्यांच्या अंगी कुठेही बडेजावपणा दिसत नाही. साधी राहणी व उच्च विचारसरणी हेच त्यांच्या जीवनाचे तत्व होय. डॉ.पंजाबराव देशमुख यांनी स्थापन केलेली श्री शिवाजी शिक्षण संस्था आज ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या बळावर व भैयासाहेबांच्या नेतृत्वाने नेत्रदीपक प्रगती करत आहे. संस्थेच्या 'तमसो मा ज्योतिर्गमय' या उद्दिष्टानुसार नेत्रदीपक प्रगतीचा हा नंदादीप अखंडपणे तेवत ठेवण्याचे बळ डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या विचारांचे पाईक व शिवसंस्थेचे सारथी मा.श्री हर्षवर्धनजी देशमुख साहेब यांना संस्थेचे आजीवन सारथ्य करण्याचे अमृतमय शताब्दी आयुष्यलाभो, हीच या मंगलदिनी सदिच्छा व्यक्त करतो.



डॉ.चत्रभूज बाळासाहेब कदम
महात्मा फुले महाविद्यालय, वरुड

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

### शेअर मार्केटच्या नादाने वाताहात

# कर्जबाजारी मुख्याध्यापकाची कुटुंबासह आत्महत्या

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**सोलापूर** – जिल्ह्याच्या बार्शी तालुक्यातील हत्तीज गावात एका जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकाने आपल्या दोन मुलांसह पत्नीला विष देऊन स्वतःची जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शेअर मार्केटमध्ये झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या नुकसानामुळे हे



टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले असून या घटनेमुळे संपूर्ण बार्शी तालुक्यावर शोककळा पसरली आहे. योगेश पाटील, माधुरी पाटील, अथर्व पाटील आणि शिवांश पाटील अशी मृत्यू झालेल्या कुटुंबातील सदस्यांची नावे आहेत. मृत योगेश पाटील हे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. काही काळापासून ते शेअर बाजारात मोठी गुंतवणूक करत होते, मात्र शेअर मार्केटमध्ये त्यांना सातत्याने प्रचंड आर्थिक नुकसान सहन करावे लागले. या नुकसानाची भरपाई करण्यासाठी आणि बाजारात टिकून राहण्यासाठी त्यांनी एक कोटी ऐंशी लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. पत्नी, दोन्ही मुलांना विष पाजून घेतला गळफास कर्जाचा हा डोंगर आणि वसुलीसाठी होणारा मानसिक ताण यामुळे ते गेल्या काही दिवसांपासून प्रचंड विवंचनेत होते. याच आर्थिक मानसिकतेतून योगेश पाटील यांनी टोकाचे पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला.

# आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगार गणेश काळेला अटक

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – दुबई आणि बँकॉक येथे बसून भारतातील हजारो नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगारी सिंडिकेटचा पिंपरी-चिंचवड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या टोळीचा मुख्य सूत्रधार सौरभ उर्फ गणेश बाळासो काळे याला थायलंडमधील बँकॉक विमानतळावर अटक करण्यात आली असून, ११ जून रोजी मुंबई विमानतळावर त्याला



अधिकृतपणे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. गणेश काळे हा थेट चीनमधील सायबर गुन्हेगारांच्या संपर्कात होता. भारतातील काही व्यक्तींकडून बँक खाती मिळवून त्यांचा वापर गुन्ह्यातील रक्कम गोळा करण्यासाठी केला जात होता. त्यानंतर हा काळा पैसा दुबईतून हाताळला जात असल्याचे तपासात समोर आले आहे. टास्क फ्रॉड, शेअर मार्केट इन्व्हेस्टमेंट फ्रॉड आणि डिजिटल अरेस्ट यांसारख्या आधुनिक क्लृप्त्यांचा वापर करून आरोपी भारतीय नागरिकांची आर्थिक फसवणूक करत असल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे.

यामध्ये शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली २ कोटी ६६ लाख रुपयांची फसवणूक, हिंजवडी पोलीस ठाण्यात १८ लाख रुपयांची फसवणूक तसेच देहूरोड पोलीस ठाण्यात ऑनलाइन टास्क फ्रॉडचा गुन्हा दाखल आहे.

# मोरेच्या अडचणीत वाढ होण्याच्या शक्यता : गृह विभागाकडून यापूर्वीच्या सर्व व्हिडीओंची चौकशी होणार, पंकज भोयर यांचा निर्वाणीचा इशारा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – प्रणित मोरेच्या शोमधले '३७० रुपयांची बिर्याणी' आणि डॉक्टर सेजल पवार या तरुणीचं मृतदेहाच्या प्रायव्हेट पार्ट्सबाबतचं अश्लील वक्तव्य सोशल मीडियावर जोरदार व्हायरलं झालं आणि देशभरात मोठा गदारोळ झाला असून देशात संतापाची लाट उसळली आहे.

अशातच डॉ.सेजल पवारने रुग्णालय प्रशासनाकडे लेखी माफीनामा सादर केला. याप्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या समितीने संबंधित



कॉमेडी शोचं संपूर्ण रेकॉर्डिंग पाहून विद्यार्थिनीशी सविस्तर चर्चा केली असल्याची माहिती आहे. तर दुसरीकडे प्रणित मोरेने देखील सोशल मीडियातून माफी मागितली आहे. माझी ती सर्वात मोठी चूक होती. मला माफ करा आणि पुन्हा एक संधी द्या, मी नक्कीच चांगला व्यक्ती बनून दाखवेन असं तो म्हणाला आहे. असं असताना आता कॉमेडीयन प्रणित मोरे याच्या अडचणी वाढणार असून गृह विभागाकडून प्रणित मोरे याच्या यापूर्वीच्या सर्व व्हिडिओची चौकशी होणार. यापूर्वी अपलोड केलेले व्हिडिओ कंटेन्टची सायबर पोलीसांकडून सखोल चौकशी सुरु आहे. अशी माहिती राज्याचे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली आहे.

# मोर्शी तालुक्याला गारपिटीचा तडाखा : संत्रा उत्पादक शेतकरी संकटात

### हिवरखेड महसूल मंडळात सर्वाधिक नुकसान

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यात दिनांक १२ जून रोजी ४ वाजताच्या दरम्यान अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस व जोरदार गारपिट झाल्यामुळे मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, आधीच नैसर्गिक संकटे, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चिततेचा सामना करणारा शेतकरी पुन्हा एकदा अडचणीत सापडला आहे.

विशेषतः हिवरखेड महसूल मंडळातील दापोरी डोंगर यावली, घोडदेव,



सालबर्डी पाळा मायवाडी भाईपूर यासह अनेक गावांमध्ये गारपिटीचा सर्वाधिक फटका बसला असून संत्रा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

अनेक ठिकाणी संत्र्यांची फळगळ झाली असून झाडांवरील फळांना गंभीर इजा पोहोचली आहे. काही भागांत गारपिटीमुळे झाडांच्या फांद्या तुटल्या असून आगामी हंगामावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हजारो रुपयांचा खर्च करून संत्रा बागांचे संगोपन करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ वेळेवर मिळत नसल्याने आणि पिक विमा कंपन्यांकडूनही अपेक्षित मदत न मिळाल्याने शेतकरी हतबल झाला आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण करून पंचनामे करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी प्रशासनाकडे मागणी करताना सांगितले की, गारपिटीमुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. महसूल व कृषी विभागाने संयुक्तपणे तात्काळ पंचनामे करून वस्तुनिष्ठ नुकसान अहवाल शासनाकडे सादर करावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत, विशेष अनुदान आणि विमा भरपाई देण्यात यावी.

अन्यथा शेतकऱ्यांच्या भावना तीव्र होऊन आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल. दरम्यान, हिवरखेड महसूल मंडळासह परिसरातील गावांमध्ये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाकडे मदतीची अपेक्षा व्यक्त केली असून, केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष मदत मिळावी अशी मागणी होत आहे.

गारपिटीमुळे उद्ध्वस्त झालेल्या संत्रा उत्पादकांना तातडीचा दिलासा देण्यासाठी शासनाने विशेष पॅकेज जाहीर करावे, अशी मागणीही जोर धरत आहे.


# यंदाच्या नव्या शैक्षणिक वर्षापासून त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी नाही

### शालेय शिक्षण विभागाकडून पहिली ते आठवीसाठी वेळापत्रक जाहीर

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – १५ जूनपासून सुरु होणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षापासून त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी करण्यात येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. शालेय शिक्षण विभागाकडून इयत्ता तिसरी ते आठवीसाठी विषय योजना, शालेय कामाचे दिवस, विषय निहाय तालिका विभागणी व शालेय वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

त्रिभाषा धोरण अंमलबजावणीबाबत



समितीच्या शिफारशी व त्यावरील होणाऱ्या शासनाचे निर्णयास अनुसरुन तिसऱ्या भाषेबाबत निर्णय होईपर्यंत प्रचलित अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तकांचा उपयोग करण्यात येणार,असा निर्णय राज्यस्तरीय सुकाणू समिती बैठकीत घेण्यात आला आहे. प्रचलित पद्धतीनुसार तिसरी भाषा बाबत विद्यमान धोरण कायम असल्याने इ.५वीपासून पुढील वर्गासाठी यापूर्वी लागू असलेली तिसरी भाषा पद्धती नवीन धोरण व नवीन अभ्यासक्रम लागू होईपर्यंत तशीच लागू राहील. पूर्वीचा कार्यानुभव हा विषय यापुढे कार्यशिक्षण या नावाने ओळखला जाईल. इयत्ता तिसरी ते पाचवी मराठी माध्यमांच्या शाळांसाठी विषय योजना खालील प्रमाणे राहील– मराठी प्रथम भाषा, इंग्रजी द्वितीय भाषा, गणित, ( प्रचलित पद्धतीनुसार भाषा विषय), आपल्या सभोवतालचे जग भाग १, आपल्या सभोवतालचे जग भाग २, कलाशिक्षण, शारीरिक शिक्षण व निरामयता, कार्यशिक्षण.

# आधी गोशाळेतला आजारी बैल, नंतर मुख्यमंत्र्यांचे थेट निर्देश

### अखेर लातूरच्या शेतकऱ्याला मिळाला पसंतीचा बैल : गावात ओवाळून स्वागत

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**लातूर** – निसर्गाच्या अवकृपेमुळे लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील बोंबळी गावातील भूमिहीन शेतकरी काशिनाथ गायकवाड यांच्यावर मोठे संकट कोसळले होते. ऐन पेरणीच्या हंगामात वादळी पावसामुळे वीज पडून त्यांच्या शेतीचा एकमेव आधार असलेला बैल मृत्युमुखी



पडला. शेतीचे काम बटाईने घेतलेले असल्यामुळे काम थांबवणे शक्य नव्हते. त्यामुळे गायकवाड यांच्या पत्नीने स्वतः पुढे येत नांगराचे जू आपल्या खांद्यावर घेतले. या विदारक दृश्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आणि राज्यभरातून हळहळ व्यक्त करण्यात आली.

प्रशासनाकडून आधी मिळाला आजारी बैल

या घटनेची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून शेतकऱ्याला मदत करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार १० जून रोजी पशुसंवर्धन विभागाने एका स्थानिक गोशाळेतून शेतकऱ्याला बैल उपलब्ध करून दिला.

# खासदारांना फोडून आम्हाला झुकवू शकत नाही : अभिषेक बॅनर्जींचे भाजपला आव्हान, सीआयडी समन्सवरून टीका

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**कोलकाता** – पश्चिम बंगालमधील सत्ता बदलानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

तृणमूल कांग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि खासदार अभिषेक बॅनर्जी यांना कथित बनावट स्वाक्षरी प्रकरणी पश्चिम बंगाल सीआयडीने दुसऱ्यांदा चौकशीसाठी समन्स बजावले आहे. १४ जून रोजी त्यांना हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर अभिषेक बॅनर्जी यांनी आक्रमक भूमिका घेत तपास यंत्रणांच्या 'टायमिंग'वर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

सीआयडीचे अधिकारी शुक्रवारी अभिषेक बॅनर्जी यांच्या निवासस्थानी नोटीस देण्यासाठी पोहोचले



होते. बॅनर्जी घरात नसल्यामुळे अधिकाऱ्यांना तब्बल ३ तास ताटकळत राहावं लागलं. या घडामोडींनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना अभिषेक बॅनर्जी यांनी सरकारवर आणि तपास यंत्रणांवर जोरदार निशाणा साधला.

तपास यंत्रणांना नेहमीच सहकार्य करतो अभिषेक बॅनर्जी म्हणाले की, 'यापूर्वी सीआयडीने मला बोलावले होते, तेव्हा मी साडेपाच तास तिथे थांबून चौकशीला सामोरे गेलो. आता मला १४ जूनला पुन्हा बोलावण्यात आलं आहे, तेव्हाही मी नक्की जाईन. मी नेहमीच तपास यंत्रणांना सहकार्य करतो. मी घरी नसताना अधिकारी नोटीस घेऊन आले होते. माझ्या अनुपस्थितीत इतर कोणाकडे नोटीस देण्यास परवानगी नसल्यामुळे त्यांना माझ्या येण्याची वाट पाहावी लागली.'

सरकार बदलताच केसेसचा सपाटा सुरू अभिषेक बॅनर्जी यांनी या कारवाईमागे राजकीय सूडबुद्धी असल्याचा थेट आरोप केला आहे. निवडणुकीच्या काळात त्यांनी माझ्याविरोधात कोणतीही तक्रार केली नव्हती.


मात्र, आता बंगालमध्ये सरकार बदललं आहे, त्यामुळे माझ्यावर वारंवार गुन्हे दाखल केले जात आहेत,' असं बॅनर्जी म्हणाले आहे.

# दुष्काळाचं सावट, 'एल निनो'मुळे यंदा कुठे कमी तर कुठे जास्त पाऊस होणार

### भारतीय हवामान विभागाचा इशारा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – देशभरात यंदा दुष्काळाचे सावट गडद होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. भारतीय हवामान विभागाने प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाल्याची माहिती देत, मान्सूनच्या काळात त्याची तीव्रता आणखी वाढण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे देशातील अनेक भागांत पावसाचे स्वरूप बदलण्याची शक्यता निर्माण झाली असून, काही प्रदेशांमध्ये दुष्काळसदृश स्थिती उद्भवण्याची भीती व्यक्त होत आहे, 'एल निनो'च्या परिणामामुळे जगातील अनेक



भागांमध्ये तापमानात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तर दुसरीकडे यासंदर्भात संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन केंद्र आणि राज्य सरकारांनी हालचाली सुरू केल्या असल्याची माहिती आहे.

शेतकऱ्यांची चिंता वाढली खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच आलेल्या या हवामान विभागाच्या इशाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. भात, सोयाबीन, कापूस, डाळी आणि तेलबियांसह इतर पिकांसाठी पाऊस अत्यंत महत्त्वाचा असतो. पाऊस कमी प्रमाणावर पडल्यास पेरण्या रखडू शकतात. शेतकऱ्यांवरती दुबार पेरणीची वेळ येऊ शकते. शेतकऱ्यांचा खर्च वाढू शकतो. यावरती सरकारने हालचाली सुरू केल्या आहेत.

अल निनोमुळे दुष्काळाची भीती वाढली? एल निनो आणि दुष्काळ यांचा थेट संबंध असल्याचे निश्चितपणे सांगता येत नसले, तरी भूतकाळातील अनेक दुष्काळी परिस्थितींमध्ये एल निनोचा प्रभाव जाणवला आहे. त्यामुळे हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या शक्यतांकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. जर मान्सून अपेक्षेपेक्षा कमी झाला, तर पावसावर अवलंबून असलेल्या भागांमध्ये पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम धरणांतील जलसाठ्यावरही होऊ शकतो. तसेच जनावरांसाठी चारा आणि नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती आहे. परिणामी, अशा परिस्थितीचा फटका केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावरही बसू शकतो.

पूर्वानुभव काय सांगतो? २००२, २००९ आणि २०१५ या वर्षांमध्ये एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनवर मोठा परिणाम झाल्याची नोंद आहे. अनेक राज्यांमध्ये पावसाचे प्रमाण कमी झाले होते. याचा मोठा फटका शेतीला होता. काही भागांत दुष्काळी परिस्थितीही निर्माण झाली होती. प्रत्येक एल निनो वर्ष दुष्काळीच ठरते असे नाही.

# एक लोकाभिमुख नेता : हर्षवर्धन देशमुख

# यांचा ५० वर्षांचा निष्कलंक राजकीय प्रवास



लोकशाहीचा खरा अर्थ ज्यांच्या कृतीतून दिसतो, ज्यांच्या आयुष्याचा प्रत्येक टप्पा जनसेवेला वाहिलेला आहे, असे व्यक्तिमत्व म्हणजे हर्षवर्धनजी देशमुख. श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष, महाराष्ट्राचे माजी कृषी मंत्री आणि वरुड–मोर्शीच्या विकासाचे शिल्पकार. आज त्यांचा अमृत महोत्सव. ७५ वर्षे वय आणि ५० वर्षे यशस्वी राजकीय प्रवास. निष्कलंक चारित्र्य, उदार मन आणि विकासाभिमुख दृष्टीकोन यांचा संगम म्हणजे हर्षवर्धनजी. या अमृत महोत्सवानिमित्त त्यांच्या कार्याला सलाम. ५० वर्षांचा निष्कलंक राजकीय प्रवास – लोकांच्या आग्रहास्तव झालेले नेतृत्व१९७० च्या दशकात युवक काँग्रेसपासून सुरु झालेला प्रवास आजही तितक्याच ऊर्जा आणि तळमळीने सुरु आहे. हर्षवर्धन हे कधीही सत्तेसाठी राजकारणात आले नाहीत. लोकांच्या आग्रहास्तव, गावगाड्याच्या गरजेसाठी त्यांनी प्रत्येक निवडणुक लढवली आणि जिंकली. आमदार, खासदार, मंत्री अशा सर्व पदांवर काम करताना त्यांनी कधीही पदाचा अहंकार केला नाही. त्यांच्या ५० वर्षांच्या कारकिर्दीत एकही भ्रष्टाचाराचा डाग नाही. विरोधकही त्यांच्या चारित्र्यावर बोट ठेवु शकले नाहीत. हा निष्कलंकपणा आजच्या राजकारणात दुर्मिळ आहे. 'जनतेचा पैसा जनतेसाठी हे त्यांचे ब्रीदवाक्य. प्रत्येक योजना, प्रत्येक निधीचा हिशोब पारदर्शक ठेवला. म्हणूनच लोकांनी त्यांना वारंवार निवडून दिले. लोकनेता ते लोकाभिमुख नेता हा प्रवास त्यांनी साधा केला. उदार मनाचा माणूस – शिक्षणाला वाहिलेले आयुष्य सत्ता आणि संपत्ती माणसाला स्वार्थी बनवते, पण हर्षवर्धनजींच्या बाबतीत अपवाद आहे. त्यांचे उदार मन सर्वात जास्त दिसते ते शिक्षण क्षेत्रात. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवले. गोरगरीब, शेतकऱ्याच्या मुलाला दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी संस्थेचा विस्तार केला. शिष्यवृत्ती, वसतिगृह, क्रीडा संकुल – प्रत्येक गोष्ट त्यांनी मुलांसाठी उभी केली. त्यांचे म्हणणे एकच 'शिक्षणाशिवाय खरा विकास होऊ शकत नाही'. आज संस्थेतून शिकून बाहेर पडलेला प्रत्येक विद्यार्थी त्यांना 'बाबा' म्हणुनच ओळखतो. पदापेक्षा नातं मोठं मानणारी ही उदार वृत्तीच त्यांना सर्वप्रिय बनवते.

**विकासाभिमुख दृष्टी** – वरूड तालुका सिंचनाचे महामेरु वरुड–मोर्शी हा भाग डोंगराळ आणि कोरडवाहू. शेतकऱ्याच्या डोळ्यात पाण्यासाठी आसू होते. हर्षवर्धनजींनी ही व्यथा जवळून पाहिली. आणि मग सुरू झाली त्यांची धावपळ. मंत्री असताना आणि नसतानाही त्यांनी सिंचनाला प्राधान्य दिले. म्हणुनच त्यांना वरुड तालुका सिंचनाचे महामेरु म्हटले जाते. **कोल्हापुरी बंधारे क्रांती:** विदर्भात कोल्हापुरी बंधारे फारसे प्रचलित नव्हते. हर्षवर्धनजींनी महाराष्ट्रातील यशस्वी मॉडेल अभ्यासले आणि ते वरुडच्या नद्या–ओढ्यांवर आणले. शेकडो कोल्हापुरी बंधारे बांधले गेले. कमी खर्चात, स्थानिक सहभागातून तयार झालेले हे बंधारे आजही हजारो एकर शेताला पाणी देतात. एका पावसाळ्यातील पाणी अडवून उन्हाळा हिरवा करण्याची दूरदृष्टी त्यांनी दाखवली. **धावपळ आणि पाठपुरावा:** निधी मंजूर करुन घेणे सोपे नाही. मंत्रालयाच्या दालनात, दिल्लीच्या दारात त्यांनी शेतकऱ्याच्या पाण्यासाठी कित्येक दिवस घातले. अधिकारी, इंजिनियर यांच्यामागे लागून प्रकल्प पूर्ण करुन घेतले. कधीही फोटो काढून श्रेय घेण्याच्या भानगडीत ते पडले नाहीत. बंधारा पूर्ण झाला की, शेतकऱ्याच्या शेतात उभे राहून समाधानाने बघायचे, हीच त्यांची खरी पूजा. आज वरुड तालुका हिरवागार दिसतोय, शेतकऱ्याच्या हाताला काम आहे, स्थलांतर थांबलंय – यामागे हर्षवर्धनजींची दूरदृष्टी आणि अथक परिश्रम आहेत. **दूरदृष्टी असणारा नेता** – कृषी मंत्री म्हणुन दिलेली दिशा महाराष्ट्राचे कृषी मंत्री म्हणून त्यांनी शेतकऱ्याच्या समस्येला केंद्रस्थानी ठेवले. बियाणे, खत, कर्ज आणि बाजारपेठ – या चौकोनातून शेतकऱ्याची मुक्तता कशी होईल? यासाठी धोरणे आखली. दुष्काळ, अतिवृष्टीच्या काळात त्यांनी शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन मदत पोहोचवली. त्यांची दूरदृष्टी फक्त आजच्या समस्यांपुरती मर्यादित नव्हती. उद्याचे २० वर्षे कसे असतील याचा विचार करून त्यांनी पाणी, शिक्षण आणि सहकार या तीन पायांवर विकासाची इमारत उभी केली म्हणुनच आजही त्यांच्या नावाने गावात रस्ता, शाळा, बंधारा आहे. लोक त्यांचे नाव अभिमानाने घेतात. **लोकनेता ते लोकसेवक – व्यक्तिमत्वाचे पैलु** हर्षवर्धनजी म्हणजे मिसळलेला माणुस. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांना भेटणे, बंधाऱ्याची पाहणी करणे, गावगाड्याचा प्रश्न सोडवणे – हे त्यांचे नित्य कर्म. अमृत महोत्सव हा फक्त वाढदिवस नाही तर ५० वर्षांच्या सेवेचा उत्सव आहे. निष्कलंक चारित्र्य, उदार मन, विकासाभिमुख कृती आणि दूरदृष्टी या गुणांची मूर्ती म्हणजे हर्षवर्धन देशमुख. ईश्वर त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अशीच जनसेवा करण्याची शक्ती देवो, हीच अमृत महोत्सवानिमित्त प्रार्थना. 'आपण केलेले कार्य म्हणजे खरी पूजा आणि जनतेचे आशीर्वाद म्हणजे खरा प्रसाद' – या विचारावर चालणाऱ्या लोकाभिमुख नेत्याला त्रिवार वंदन!



**किसन पुंडलिकराव सोनारे**
**वाडेगाव, वरुड**

# घरातून पैसे चोरुन नेणारे चोरटे २४ तासांत गजाआड : मुद्देमालही जप्त

## शिरखेड पोलिसांची कामगिरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***मोर्शी*** – शिरखेड पोलीसांनी वाघोली येथील आजारी असलेल्या एका ईसमाच्या घरातुन पैसे चोरुन नेणाऱ्या आरोपींना अटक करण्यात आली, पोलीसांनी आरोपीकडुन चोरीला गेलेला मुद्देमाल ६० हजार रुपयांपैकी ५० हजार जप्त करण्यात आले. शिरखेड पोलिसांनी अवघ्या २४ तासांत चोरटयांचा शोध घेत त्यांना गजाआड केले.

या प्रकरणी प्राप्त माहीतीनुसार, वाघोली येथील रहिवासी असलेला संजय वानखडे (५०) हे अपघात झाल्याने घरीच बेडवर पडुन होते. वडिलांनी शेती विकुन आणलेले पैसे बँकेत जमा केले होते मुलगा आजारी असल्यामुळे वडिलांनी बँकेतुन काढुन ८० हजार रुपये घरी घेवुन आले ज्या बेडवर मुलगा झोपला त्याच बेडवरच्या गादी खाली बँकेतुन आणलेली रक्कम ठेवून दिली काही दिवसानंतर फिर्यादीच्या वडिलांचा मृत्यु झाला वडिलांच्या अंत्यविधी करीता आणलेली ८० हजार रुपयांमधुन २० हजार रुपये खर्च केले उर्वरीत ६० हजार रुपये बेडच्या गादी खाली फिर्यादीने ठेवुन दिले होते. फिर्यादी संजय वानखडे यास त्याचे मित्र ५ जुन रोजी वाघोली येथील संजय वानखडेच्या घरी आले असता भेट झाल्यांनतर त्याच घरात फिर्यादी संजय पेशंट व मित्र यांनी दारु ढोसली. संजय यास दारु जास्त झाल्याने तो तेथेच झोपला. भेटण्याकरीता आलेले त्याचे तिन मित्र तेथुन निघुन गेले त्यानंतर दुसऱ्या दिवशी फिर्यादी पेशंट यास जाग आल्यानंतर त्याचे लक्षात आले की, बेड खाली ठेवलेले ६० हजार रुपये रात्रीच्या सुमारास कोणीतरी अज्ञात चोराने पैसे चोरुन घेवुन नेले. या प्रकरणी संजय माणीकराव वानखडे रा. वाघोली याचे तक्रारीवरुन शिरखेड पो–लीसांनी अज्ञात चोरटया विरुध्द गुन्हा दाखल करुन ठाणेदार ईश्वर वर्गे यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरिक्षक किसन धुर्वे, पोलीस हवालदार पुंजाराम मेटकर, गजानन तीजारे, पोकॉ.मयुर कापडे, पंकज चौधरी, वैभव घोगरे व नितेश आसोलकर यांनी तपासाचे चक्रे संशयीत असलेले फिर्यादी यांच्या मित्राकडे फिरविली असता सर्व प्रथम उडवाउडवीचे उत्तरे देत होते तेव्हा पोलीसांनी आपली खाकी दाखवताच सर्व पोपटा सारखे बोलु लागले. चोरीचा तपास अवघ्या २४ तासाच्या आत शिरखेड पोलीसांनी लावुन शरद उर्फ रंजित विठोबाजी मेश्राम (४२), किशोर ज्ञानेश्वर सायतकर (४२) दोन्ही रा. लेहेगाव, योगीराज उर्फ योगेश देवरावजी वानखडे (३२) रा.वाघोली ता.मोर्शी यांचे कडुन ५० हजार ३०० रुपये हस्तगत करून जेरबंद केले. पुढील तपास पीएसआय किसन धुर्वे, पोलीस हवालदार पुंजाराम मेटकर व पोका मयुर कापडे करीत आहे.

# विधान परिषद निवडणुकीत रेश्मा काळेंच्या माघारीसाठी हालचाली : जळगावचा पेच सुटण्याबाबत गिरीश महाजन आशावादी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***जळगाव*** – विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत नाशिकमधील तिढा सुटल्यानंतर जळगावमधील राजकीय पेचही लवकरच सुटेल, असा विश्वास राज्याचे मंत्री तथा भाजप नेते गिरीश महाजन यांनी व्यक्त केला आहे.

नाशिकमध्ये भाजपचे बंडखोर उमेदवार गीते यांनी उमेदवारी मागे घेतल्याने तेथील प्रश्न निकाली निघाला असून, जळगावमधील तिढाही उद्यापर्यंत सुटेल, अशी अपेक्षा त्यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली.

महायुतीत नाशिकची जागा शिवसेनेला (शिंदे गट) मिळाल्यानंतर भाजपचे बंडखोर उमेदवार गीते यांनी अर्ज दाखल केला होता.

मात्र, त्यांनी गुरुवारी उमेदवारी मागे घेत शिवसेनेच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला. दुसरीकडे, जळगावमध्ये जागा भाजपच्या वाट्याला आली असतानाही शिवसेनेच्या (शिंदे गट) नगरसेविका रेश्मा काळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करून महायुतीसमोर पेच निर्माण केला आहे.

रेश्मा काळे यांनी उमेदवारी मागे घ्यावी, यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू असले, तरी त्या आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे सांगितले जात आहे.

स्थानिक पातळीवर त्यांना मिळणारा वाढता पाठिंबा आणि कार्यकर्त्यांमधील नाराजी ही भाजपसाठी चिंतेची बाब ठरत असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात आहे.

दरम्यान, गिरीश महाजन गुरुवारी जळगाव दौऱ्यावर आले असता खासदार, आमदार, भाजप पदाधिकारी तसेच शिवसेनेच्या (शिंदे गट) आमदारांची एका हॉटेलमध्ये बैठक झाली.

# राज्यातील ११६ दुय्यम कारागृहांना कायमचे टाळे : महसूल विभागाचा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – राज्यातील सर्वच्या सर्व ११६ दुय्यम कारागृहांना कायमस्वरूपी टाळे लावण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. २० ते १०० कैद्यांची क्षमता असलेली या कारागृहांची दुरवस्था झाल्याने तसेच यातील ८० कारागृहे बंदच असल्याने ही कारागृहे दुरुस्त न करता कायमस्वरूपी बंद करण्यात येणार आहेत. महसूल विभागाने शुक्रवारी या संदर्भतील शासन निर्णय जारी केला.

राज्यभरातील दुय्यम कारागृहांची सद्य:स्थिती आणि त्यांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी गृह विभागाने १७ ऑक्टोबर २०२३ रोजी एका विशेष अभ्यासगटाची स्थापना केली. या अभ्यासगटाने १० डिसेंबर २०२४ रोजी आपला अंतिम अहवाल सरकारला सादर केला. या अहवालावर महसूल आणि गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांची संयुक्त बैठक झाली. या बैठकीनंतर ही कार्यालये बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे ब्रिटिश काळापासून चालत आलेली आणि स्वातंत्र्यानंतर सात दशकांहून अधिक काळ अस्तित्वात असलेली 'दुय्यम तुरुंग नियमपुस्तिका, १९५२' इतिहासजमा झाली आहे. सध्या राज्यातील एकूण ११६ दुय्यम कारागृहांपैकी तब्बल ८० कारागृहे आधीच बंद अवस्थेत पडलेली आहेत तर उर्वरित ३६ कारागृहे तांत्रिकदृष्ट्या कार्यरत असली तरी ती सुस्थितीत नाहीत.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैदाने, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४५५/२०२६** **ने.ता.०७/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती बेबी मारोती धाडसे, वय अं.७३ वर्ष, धंदा–गृहिणी, २) धम्मपाल मारोती धाडसे, वय अं.३३ वर्ष, धंदा- मजुरी, क्र.१ व २ रा.मोरचुंद, पो.पवनी, ता.वरुड, जि.अमरावती, ३) सौ.रजनी संजय शियाले, वय अं.३८ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.रोषनखेडा, ता.वरुड, ४) श्रीमती चंदा सिध्दार्थ मेश्राम, वय अं.३६ वर्ष, धंदा–गृहिणी, रा.रमाई नगर, नागरी रिंग रोड, पाण्याच्या टाकीजवळ, नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत मारोती सिताराम धाडसे, रा.मोरचुंद, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिदीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **११/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-३००/२५-२६** **दि.११/०६/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **दत्तू पुंजाराम गाडे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म–मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **मुलगी नामे प्रीयांशु दत्तुजी गाडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१५/०९/२०१०** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म–मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **११/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

**विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-१०६/२०२६** **दि.१६/०४/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **श्री खुशाल मारोतराव सिनकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म–मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे खुशाल मारोतराव सिनकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१०/०७/१९६८** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म–मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१६/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

# डिझेल विक्रीवर मर्यादा! दिवसाला मिळणार केवळ २०० लिटर

***नवी दिल्ली*** – जागतिक पातळीवर पुरवठा साखळीतील विस्कळीतपणामुळे देशात इंधनाचा तुटवडा निर्माण होऊ नये म्हणून केंद्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. नव्या आदेशानुसार, पेट्रोल पंपावरून एका



वाहनाला दिवसाला जास्तीत जास्त २०० लिटर डिझेल देण्याची मर्यादा घालण्यात आली आहे. तसेच औद्योगिक, व्यावसायिक आणि संस्थात्मक अशा घाऊक ग्राहकांना आता थेट पेट्रोल पंपावरून पेट्रोल किंवा डिझेल खरेदी करता येणार नाही. हा नवा नियम पुढील ९० दिवसांसाठी लागू असेल. पेट्रोल पंपांवरील किरकोळ दर आणि घाऊक दर यांच्यातील मोठ्या फरकामुळे घाऊक ग्राहकांनी पंपांवरून खरेदी सुरू केली होती, ज्यामुळे काही भागांत इंधनाची मागणी अनपेक्षितपणे वाढली होती.

